“महाराष्ट्रातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान विषयातील पीएच. डी. प्रबंधातील उल्लेखांचे चिकित्सक विश्लेषण”

(“Maharashtratil Krushi aani Akrushi Vidyapeethat Sadar Kelelya Gruha Vidnyan Vishyatil Ph.D. Prabandhatil Ullekhanche Chikitsak Vishleshan”**)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आंतरविद्याशाखे अंतर्गत पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

शिंदे सिद्धार्थ बाबूराव

मार्गदर्शक

डॉ. घटकार दगडू तुकाराम

सहायक प्राध्यापक

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट

ता. जळकोट, जि. लातूर

संशोधन केंद्र

स्कुल ऑफ मेडिया स्टडीज,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै २०२३

महाराष्ट्रातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान विषयातील पीएच. डी. प्रबंधातील उल्लेखांचे चिकित्सक विश्लेषण

1. प्रस्तावना

आजचे युग हे माहितीचे युग म्हणून ओळखले जाते. नवीन माहिती निर्माण करण्यासाठी संशोधनाची गरज असते. कोणत्याही बाबीचा नव्याने शोध घेण्यासाठी संशोधन कार्य करणे गरजेचे असते. उपयुक्त मांडणी करण्यासाठी सातत्याने संशोधन करण्याची आवश्यकता असते. संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधनामुळे व्यक्तीचा, समाजाचा तसेच देशाचा नावलौकिक वाढण्यास मदत होते. अज्ञानातून मुक्तता, अज्ञानाचा त्याग, सामाजिक कल्याण साध्य करणे, प्रगती करणे, समाज निर्माणास मदत करणे, राष्ट्र घडवणे आणि राष्ट्राची उन्नती प्रगती करणे इत्यादी कार्य करण्यासाठी संशोधन कार्य प्रक्रिया प्रभावीपणे करणे गरजेचे असते. माहितीच्या बळावरच हे सहज शक्य आहे म्हणूनच सध्याचे युग हे माहिती युग म्हणून संबोधणे सार्थ ठरते.

सध्या विविध नवीन विषय निर्माण होत आहेत. स्थुलतेतून सूक्ष्मतेकडे प्रत्येक विषयाची वाटचाल होत असल्याचे दिसून येते. मुद्रण कलेच्या आणि इंटरनेटच्या शोधानंतर वाचन साहित्यात लक्षणीय प्रमाणात वाढ होत आहे. माहितीचा परिस्फोट झाल्यासारखी सध्याची परिस्थिती आहे. सध्याच्या युगात विविध मार्गाने माहिती निर्माण होण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. माहितीची निर्मिती तसेच त्याचा प्रसार हा तंत्रज्ञानाच्या व इंटरनेटच्या मदतीने खूपच वेगवान बनला आहे.

संशोधन हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो. मानवाने अग्नीच्या तसेच चाकाच्या शोधापासून ते आज अंतराळात मंगळ ग्रहापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणे चालू आहे ते निरंतर संशोधनामुळेच हे शक्य झाले असल्याचे आपणास दिसून येते. संशोधन म्हणजे फक्त प्रयोगशाळेत बसून केले जाते ते नसून मानवाच्या सर्वांगीण बाबीच्या विकासासाठी त्याच्या सुखकर जीवनासाठी केले जाणारे प्रयत्न म्हणजेच संशोधन होय. कोणत्याही समस्येचा, प्रश्नाचा किंवा शंकेचा शोध घेऊन त्यावर उपाय शोधण्याचे कार्य संशोधन करीत असते. थोडक्यात संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करण्याचे माध्यम होय. त्यासाठी संशोधक विविध मुद्रित आणि अमुद्रित संदर्भ साधनाचा वापर करीत असतो. ही साधने कशी वापरली जात आहेत याचा अभ्यास करण्यासाठी बिब्लोमॅट्रिक अध्ययन उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येते. संशोधन कार्य करीत असताना संशोधकांनी कोणत्या कोणत्या संदर्भीय बाबीचा आधार घेतला आहे हे अभ्यासण्यासाठी

बिब्लियोमेट्रिक्स अध्ययन करणे ही काळाची गरज असून त्या माध्यमातून वाचकासाठी उपयुक्त वाचन साहित्य निवडण्यास ग्रंथालयास मदत होते. त्यातील महत्त्वपूर्ण घटक म्हणजेच कोणकोणते वाचन साहित्य वापरले आहे याची सांख्यिकीय माहिती मिळण्यास मदत होते. एकंदरीत पाहता संशोधन हे मानवी जीवनासाठी नित्य नव्याचा शोध घेण्यासाठी तसेच नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे. वेबस्टरच्या शब्द्कोशानुसार अभ्यासपूर्ण चौकशी किंवा निरीक्षण म्हणजे संशोधन विशेषता १) सत्याचा शोध घेण्यासाठी किंवा २) सत्याचा योग्य तो अर्थ लावण्यासाठी (म्हणजेच अर्थनिर्वचनासाठी) किंवा ३) नवीन तथ्ये (Data, माहिती) विचारात घेऊन, प्रस्थापित तत्त्वे आणि सिद्धांतामध्ये बदल करण्यासाठी, सुधारणा करण्यासाठी, किंवा ४) प्रचलित तत्त्वाचे वा सिद्धांताचे उपयोजन करण्यासाठी, सुधारणा करण्यासाठी, केलेली पद्धतशीर चौकशी किंवा प्रयोग म्हणजे संशोधन होय.[1]

2. संशोधन विषयाचे महत्व

संशोधन हा शब्द इंग्रजीतील Research या शब्दासाठी प्रतिशब्द असल्याचे आपणास दिसून येते. थोडक्यात याचा अर्थ Re म्हणजे पुन्हा आणि Search म्हणजे शोध घेणे होय. एखाद्या प्रश्नाचा किंवा समस्येचा पुन्हा नव्याने शोध घेऊन त्यातील नवीन माहिती मांडण्याचा प्रयत्न करणे होय. क्रॉपफोर याच्या मते संशोधन म्हणजे कोणत्या तरी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी क्रमबद्ध व शास्त्र शुद्ध चिंतन केलेले प्रयोग होय.[2] समाजाचा देशाचा विकास करण्यासाठी संशोधनामध्ये गुणवत्ता खूप महत्त्वाची आहे. समाजाचा तसेच देशाचा विकास होण्यासाठी संशोधन खूप मोलाची भूमिका पार पाडू शकते. ज्ञान आणि माहिती साधनाच्या निर्मितीत वेगाने वाढ होत असल्याचे दिसून येते. संशोधनाच्या बाबतीत गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी व गुणवत्तेत वाढ करण्यासाठी गृहशास्त्रातील शोध प्रबंधाचा अभ्यास करणे गरजेचे बनले आहे. सध्याच्या परिस्थितीत आपल्या देशातील सर्वच विद्यापीठात संशोधन कार्य चालू असलेले आपणास दिसून येते. गृहशास्त्र या विषयात पण विविध समस्याशी संबंधित संशोधनकार्य संशोधक करीत असतात. हे संशोधन कार्य करीत असताना संशोधक विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील व इंटरनेटवरील माहिती, शोध प्रबंध, इंटरनेट वरील ग्रंथ आणि मासिके या मुद्रित आणि अमुद्रित वाचन साहित्याचा वापर करीत असतो. संशोधक या सर्व वापरत असलेल्या मुद्रित आणि अमुद्रित वाचन साहित्याची यादी आपल्या शोध प्रबंधाच्या शेवटी वर्णक्रमाच्या रचनेनुसार देत असतो. यालाच संदर्भ सूची Bibliography असे म्हणतात. शोध प्रबंधाचे लिखाण करीत असताना ग्रंथ, संदर्भ

ग्रंथ, मासिके, शोध प्रबंध, वर्तमानपत्र व इंटरनेटवरील वाचन साहित्याचे प्रमाण किती आहे याचा अभ्यास यात केला जाणार आहे. ग्रंथमिती हे ठराविक विषयातील प्रकाशित झालेल्या ज्ञान व माहिती साधनाचे गुणधर्म संख्यात्मक पद्धतीने विश्लेषण करण्याचे साधन आहे. एका ठराविक विषयाचा विस्तार अभ्यासण्यासाठी ग्रंथमिती ही उपयुक्त ठरणारी पद्धत आहे. ठराविक विषयातील होत असलेले शोधप्रकार ओळखण्यासाठी ग्रंथमिती हे तंत्र मदत करणारे आहे. ठराविक विषयातील महत्वपूर्ण नियतकालिके किंवा मासिके ओळखण्यासाठी या तंत्राचा उपयोग होतो. ठराविक विषयाचे भाषेनुसार विभाजन करण्यासाठी ग्रंथमितीचा आधार घेता येतो. ग्रंथमिती तंत्रामुळे ठराविक विषयातील उपयुक्त साहित्य समजण्यास मदत होते.

3. संशोधन विषयाची निवड

गृह विज्ञान या विषयातील शोधप्रबंधाचे भूतकाळ आणि वर्तमान काळानुसार बदलते स्वरूप जाणून घेण्यासाठी तसेच यांची माहिती करून घेण्यासाठी तसेच यात असलेल्या सर्वांगीण बाबीचा अभ्यास करण्यासाठी या विषयाचा अभ्यास महत्वपूर्ण आहे. गृह विज्ञान या विषयातील संशोधक करीत असलेल्या संशोधन कार्याचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य गरजेचे आहे. सद्यस्थितीतील हीच गरज लक्षात घेऊन **“महाराष्ट्रातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान विषयातील पीएच. डी. प्रबंधातील उल्लेखांचे चिकित्सक विश्लेषण”** या विषयाची निवड संशोधनाकरीता करण्यात आली आहे.

संशोधनाचे शिर्षक – **“महाराष्ट्रातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान विषयातील पीएच. डी. प्रबंधातील उल्लेखांचे चिकित्सक विश्लेषण”**

4. संशोधन विषयाची गरज

बिब्लियोमेट्रिक्स मांडणीने संबधीत विषयाची संख्यात्मक आवश्यक ती माहिती मिळविण्यास मदत होते. पण ही मिळालेली माहिती विस्कळीत स्वरूपात असल्याचे दिसून येते. या विस्कळीत माहितीतून वाचकास सद्यस्थितीची कल्पना येत नाही. अशा माहितीअभावी त्याच्यावर चर्चा होवू शकत नाही किंवा प्रशासकिय असे निर्णय घेता येत नाहीत. या संकटातून किंवा समस्येतून मार्ग काढण्यासाठी संशोधकाला काही तंत्राची आवश्यकता असते. बिब्लियोमेट्रिक्स या तंत्राच्या मदतीने गृह विज्ञान या विषयातील वाचनसाहित्य प्रकारानुसार, विषयानुसार, देशानुसार, भाषेनुसार, लेखकानुसार उपयुक्त असलेल्या साहित्याची माहिती मिळविण्यासाठी

संशोधकाने प्रस्तूत संशोधन विषयाची निवड केली आहे. संशोधनातील गुणवत्ता वाढण्यासाठी संशोधकाने कायम कार्यरत असले पाहिजे. शोधप्रंबधाच्या माध्यमातून गृह विज्ञान या विषयात कोणकोणत्या शिर्षकाअतर्गत संशोधन चालू आहे अशी समस्या निर्माण झाली तसेच यापुर्वी या विषयावरील संशोधनाविषयी अभ्यास न झाल्यामूळे संशोधकाने या विषयाची निवड केली आहे. बिब्लियोमेट्रिक्स अध्ययनाच्या माध्यमातून गणितीय मांडणी करून संशोधक करत असलेल्या संशोधनातील विविध विचारप्रवाह समजण्यास मदत होते. जास्तीत जास्त कोणते संदर्भ ग्रंथ, ग्रंथ, नियतकालिके वापरतात याची शास्त्रशुध्द माहिती समजण्यास मदत होते. त्यामूळे संशोधकाने सदरील विषय अध्ययनासाठी निवडला आहे.

5. महत्वपूर्ण संज्ञा

बिब्लियोमेट्रिक्स – Biblimetrics या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Biblo आणि Metrics या दोन शब्दांनी मिळून झाली आहे. याचा अर्थ ग्रंथाचे मापन असा होतो. लिखित गुणधर्माची आणि त्यांच्याशी संबधित असलेले लोकांचे वर्तन याला संख्यात्मक स्वरूप देते ती ग्रंथमिती होय.[3] थोडक्यात ग्रंथालय आणि ग्रंथालयात उपलब्ध असलेले साहित्य यांचे मोजमाप काढण्याचे माध्यम आहे.

The Assembling and interpretation of statics relating to books and periodicals to demonstrate historical movements to determine National and Universal research, use of Books and Journals and to ascertain in many local situations the general use of books and journals ascertain in many local situation the general use to books and Journals.[4]

शोधगंगा - शोधगंगा हे भारतीय इलेक्ट्रॉनिक शोधप्रबंध उपलब्ध असलेले माध्यम आहे. हे माध्यम संशोधकांना त्यांचे प्रबंध जमा करण्यासाठी आणि संपूर्ण संशोधक समुदायाला मुक्त प्रवेश उपलब्ध करून देण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. Shodhganga is the name coined to denote digital repository of Indian Electronics Thesis and Dissertations set-by the INFLIBNET centre.[5]

6. संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तूत संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

1. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधाच्या संदर्भसुचीतील उल्लेखांचा शोध घेणे.

2. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधाच्या संदर्भसुचीतील उल्लेखांचे वाचनसाहित्य तसेच माहितीसाधनाच्या प्रकारानुसार वर्गीकरण करणे.

3. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधाचे संदर्भसुची उल्लेखांचे भौगोलीक, कालखंड व वर्षनिहाय परामर्श घेणे.

4. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधाच्या संदर्भसुचीतील उल्लेखांची भाषानिहाय व लेखकनिहाय माहिती घेणे.

5. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधाच्या संदर्भाचे उल्लेखीत साहित्याची रॅंकलिस्ट तयार करणे.

7. संशोधनाची गृहितके:-

1. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधात मोठया प्रमाणात संदर्भ उल्लेख देण्यात आलेले आहेत.

2. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधात संदर्भ उल्लेख हे विविध माहिती किंवा वाचनसाहित्य प्रकारातील आहेत.

3. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. प्रबंधात संदर्भाचा उल्लेख भौगोलीक स्थानानुसार व कालखंडानुसार उपयोग करण्यात आला आहे.

4. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील उपलब्ध प्रबंधातील संदर्भ उल्लेख वेगवेगळया लेखकांचे तसेच एक, दोन, तीन व तीनपेक्षा अधिक लेखक योगदान या प्रकारातील आहेत.

5. महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील पीएच.डी. संशोधनात जास्तीत जास्त नियतकालिकांचा उपयोग करण्यात आहे.

8. संशोधन पध्दती

संशोधन पध्दती म्हणजे फक्त अभ्यास नाही. त्याकरीता वेगवेगळया संशोधन पध्दतीचा उपयोग संशोधन कार्य करत असताना करावा लागतो.[6] जॉर्ज मौली यांच्या मतानुसार भूतकाळात घडून गेलेल्या घटनाचा शोध घेण्यासाठी केलेला विद्वत प्रयत्न म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय.[7] वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये सर्वसाधारणपणे, परिकल्पना मांडणे व ती तपासणे हि प्रक्रिया होते.[8] हे संशोधन कार्य करण्यासाठी ऐतिहासीक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

9. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही महाराष्ट्रातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयातील 137 पीएच.डी. प्रबंधापुरती मर्यादीत आहे. कृषी विद्यापीठातील ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठामधील शोधगंगा या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या गृह विज्ञान या विषयात पीएच.डी. साठी सुरूवातीपासून ते डिसेंबर 2022 पर्यंत प्रबंधापुरती मर्यादीत आहे.

10. माहिती संकलन साधने व तंत्रे

महाराष्ट्रातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या सादर केलेल्या गृह विज्ञान पीएच.डी. प्रबंधाचे संदर्भ सुचीच्या साहयाने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठात प्रत्यक्ष जाऊन तसेच अकृषी विद्यापीठात गृह विज्ञान या विषयात शोधगंगा या संकेतस्थळावरील उपलब्ध असलेल्या पीएच.डी. प्रबंधाचे संदर्भ सुचीच्या साहयाने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

11. माहिती विश्लेषण

महाराष्ट्र राज्यातील कृषी आणि अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या येथे सादर केलेल्या गृह विज्ञान या विषयात पीएच.डी. प्रबंधाचे संदर्भ सुचीच्या साहयाने माहितीचे संकलन केल्यानंतर शास्त्रीय पध्दतीचा आधार घेवून माहिती विश्लेषण करण्यात येणार आहे.

12 . प्रकरणाची रचना

प्रकरण 1. प्रस्तावना

या प्रकरणात मुलभुत माहिती व संशोधनासाठी वापरावयाची संशोधन पध्दती याबाबतचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण 2. पुर्व वाचनसाहित्याचा आढावा

या प्रकरणात प्रस्तावित संशोधन विषया संबधित ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके तसेच डिजीटल माध्यमातील वाचनसाहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण 3. माहिती संकलन

या प्रकरणात संबधीत माहितीचे संकलन व मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण 4. माहितीचे विश्लेषण

या प्रकरणात संशोधनातून आलेल्या माहितीचे विश्लेषण सादर करण्यात येणार आहे.

प्रकरण 5. निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संशोधनातून आलेले निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात येणार आहेत.

13. संदर्भ

१. कुंभार, रा. (२०१५), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, पुणे; युनिव्हर्सल प्रकाशन.

२. कायंदे पाटील, ग. वि. (२००९), संशोधन पद्धती, नाशिक, चैतन्य पब्लिकेशन.

३. येलंगे, आरती (2016), लायब्ररी हेराल्ड या नियतकालीकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांचे आशय विश्लेषण: 2007 ते 2014. एम. फील. लघुशोधप्रबंध, पुणे: टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

४. निकोसे, एस. (2007), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती, नागपूर; प्रज्ञा प्रकाशन.

५. https://shodhganga.inflibnet.ac.in › moredetails › about

६. कायंदे पाटील, ग. वि. (२००९), संशोधन पद्धती, नाशिक, चैतन्य पब्लिकेशन.

७. कुंभार, रा. (२०१५), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, पुणे; युनिव्हर्सल प्रकाशन.

८. निकोसे, एस. (2007), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती, नागपूर; प्रज्ञा प्रकाशन.

संशोधक
शिंदे सिध्दार्थ बाबूराव

मार्गदर्शक
डॉ . घटकार दगडू तुकाराम
सहायक प्राध्यापक
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय,
जळकोट, ता. जळकोट, जि. लातूर